यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : १८/११/२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (P04-B.Lib I.Sc) व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (P16-M.Lib I.Sc) कार्यान्वित आहेत. युजीसी-डीईबी नवी दिल्ली, यांच्या सूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन उद्बोधन वर्ग (Induction Programme) दि. १४/११/२०२५ रोजी आयोजित केला होता. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांवरील विद्यार्थी या ऑनलाईन उद्बोधन वर्गासाठी उपस्थित होते.

या उद्बोधन सत्रात विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षण प्रणाली, मुक्त विद्यापीठाचा परिचय, उद्दिष्टे,कार्यपद्धती याविषयी माहिती देण्यात आली. शैक्षणिक संयोजक रुपाली गायकवाड यांनी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा परिचय, उद्दिष्टे, शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पत्ती, शिक्षणक्रम संरचना, श्रेयांक, मूल्यमापन पद्धती, परीक्षा पद्धती, महत्वाची संकेतस्थळे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. B.Lib I.Sc प्रकल्प व M.Lib I.Sc प्रकल्प व शोधनिबंध यावरही विस्तृत सादरीकरण करण्यात आले. सूची प्रकल्प, कात्रण प्रकल्प, आराखडा, विषय निवड, संदर्भ साधने, माहिती विश्लेषण, निष्कर्ष यावरही तपशीलवार चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी समंत्रण सत्रांना प्राध्यान्य द्यावे व माहितीपुस्तिका वाचावी असे आवाहन करण्यात आले.

उद्बोधन वर्गाच्या प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रमाविषयी विविध प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी मार्गदर्शन केले. विद्याशाखेतील शैक्षणिक संयोजक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तांत्रिक सहाय्य केले.

ऑनलाईन झूम लिंक
https://us06web.zoom.us/j/87006779491?pwd=kXeb03sYmWUs3yvnX4m6Gb8HwsbAKt.1

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक * ज्ञानगंगा घरोघरी

Wadekar
18.11.2025

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा